दि. २५ जुलै, २०२६

# जाहीर प्रकटन

**विषय** : विद्यापीठाचा १२७ वा पदवी प्रदान समारंभ : अर्ज करण्याचा कालावधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२७ व्या पदवीप्रदान समारंभाचे आयोजन सप्टेंबर महिन्यात करण्याच्यादृष्टीने नियमित अभ्यासक्रमाच्या **ऑक्टोबर /नोव्हेंबर, २०२५ मध्ये उत्तीर्ण** झालेल्या विद्यार्थ्यांना, तसेच **दूरस्थ अभ्यासक्रमाचे एप्रिल/मे, २०२५ व ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२५ मध्ये उत्तीर्ण** विद्यार्थ्यांना पदवी/पदविका आणि पदव्युत्तर प्रमाणपत्रांसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी दिनांक ०८/०५/२०२६ ते १५/०६/२०२६ पर्यंतचा कालावधी दिला होता.

सदर एप्रिल/मे, २०२६ मध्ये नियमित अभ्यासक्रमाच्या परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल जाहिर करण्यात आले आहेत. सदर परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची लिंक सुरू करण्यात येत आहे. तसेच ऑक्टो/नोव्हें., २०२५ मधील ज्या विद्यार्थ्यांना वरील कालावधीमध्ये अर्ज करता आले नाहीत, त्यांच्यासाठी पुनश्च: विलंब शुल्कासह लिंक सुरू करण्यात येत आहे. त्यासाठीचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

ऑनलाईन अर्ज स्विकारण्याचा कालावधी –

| अ.क्र. | परीक्षा सत्र | अर्ज करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | नियमित अभ्यासक्रम ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२५ व दूरस्थ अभ्यासक्रम एप्रिल/मे, २०२५ | दिनांक २५ जुलै, २०२६ ते २२ ऑगस्ट, २०२६ ( विलंब शुल्कासह ) |
| २ | नियमित अभ्यासक्रम एप्रिल/मे, २०२६ | दिनांक २५ जुलै, २०२६ ते १५ ऑगस्ट, २०२६ ( विनाविलंब शुल्क ) |
| | | दिनांक १६ ऑगस्ट, २०२६ ते २२ ऑगस्ट, २०२६ ( विलंब शुल्कासह ) |

उपरोक्त परीक्षांमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज व त्यासाठीचे शुल्क भरता येईल. पदवी/पदविका प्रमाणपत्र मिळण्याकरिता ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी **अर्जासोबत गुणपत्रिका अपलोड** करणे आवश्यक आहे.

महत्त्वाची टीप :

तसेच एप्रिल/मे, २०२५ पूर्वीच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी पुरवणी **(Supplementary)**/दुय्यम **(Duplicate)** पदवी/पदविका प्रमाणपत्र अर्जासह शुल्क भरण्याची लिंक कायमस्वरूपी सुरू आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी नियमित पदवीप्रदान ( **127th Regular Convocation**) समारंभाच्या लिंकवर अर्ज करू नये.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ